दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper. lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२४८ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, रविवार, १८ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-




## कामात हयगय केल्यास भरावे लागतील ५ लाख; अतिरिक्त आयुक्तांकडून दंडाचे फर्मान

**■मुंबई, रोहित जसवाल :**

मुंबईतील प्रसाधनगृहाची गैरसोय दूर करण्यासाठी महापालिका लॉट-१२ अंतर्गत १४ हजार शौचालये बांधणार आहे. याला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. तसेच म्हाडाच्या प्रसाधनगृहाची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी पालिकेवर आहे. पालिकेने लॉट-१२ अंतर्गत सामुदायिक शौचालये बांधण्याच्या कामाचा आढावा शनिवारी पश्चिम उपनगरांचे अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी घेतला. या आढाव्यादरम्यान त्यांनी पश्चिम उपनगरातील कंत्राटदारांच्या कामाच्या प्रगतीबाबत असमाधान व्यक्त केले असून, याशिवाय या कंत्राटदारांच्या कामाचे शौचालयांच्या बांधकामाच्या प्रगतीनिहाय आढावा घेऊन आणि त्यांचे मूल्यमापन करून ५ लाखांपर्यंत दंड आकारण्याचे आदेश त्यांनी पालिका अधिकाऱ्यांना दिले आहेत. मुंबईतील ६० टक्के जनता झोपडपट्टीत राहते. झोपडपट्टीतील रहिवाशांना सार्वजनिक शौचालयांशिवाय पर्याय नसतो. मात्र, बहुतांश ठिकाणी या शौचालयांची दुरवस्था झाली आहे. गेल्यावर्षी पालिकेने लॉट ११ या उपक्रमांतर्गत २२ हजार शौचकूप बांधण्याचा संकल्प सोडला होता. त्यापैकी ९० टक्के शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. आता लॉट १२ अंतर्गत आणखी शौचालये बांधण्यात येणार आहेत. म्हाडाचीही शौचालये ताब्यात घेऊन त्यांची पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. एकमजली शौचालयांची पुनर्बांधणी करून त्याजागी दुमजली शौचालये बांधण्यात येणार आहेत. काही ठिकाणी नव्याने शौचालय बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी लॉट-१२ अंतर्गत पहिल्या टप्प्यात ५५९ शौचालये बांधण्यात येणार असून, मुंबईत एकूण १४ हजार १६६ नवीन शौचकुपांचे बांधकाम केले जाणार आहे. या कामासाठी ऑगस्ट महिन्यात कार्यादेश देण्यात आले होते व सल्लागारही नेमले आहेत.

# "मी कमी पडलो.. श्रीकांतच्या भाषणाने डोळे उघडले", एकनाथ शिंदे जाहीर भाषणात भावुक

## कोल्हापूर येथे शिवसेनेच्या महाअधिवेशनात बोलत होते



**■मुंबई, यश सावंत :**

मी एक बाप म्हणून, नवरा म्हणून कमी पडलो.. श्रीकांच्या भाषणाने माझे डोळे उघडले, अशा शब्दात एकनाथ शिंदेंनी भावनांना वाट मोकळी करुन दिली. ते शनिवारी कोल्हापूर येथे शिवसेनेच्या महाअधिवेशनात बोलत होते. कोल्हापूर येथील कार्यक्रमात शुक्रवारी खासदार श्रीकांत शिंदे हे भावुक झाल्याचं बघायला मिळालं होतं.

श्रीकांत शिंदे म्हणाले होते की, जनतेच्या कामात माझे वडील इतके व्यस्त असतात की आम्हाला कधीच ते वेळ देऊ शकले नाहीत. हे बोलताना श्रीकांत शिंदे भावुक झाले होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी शनिवारी सकाळी एक पोस्ट करत भावनांना वाट मोकळी करुन दिली. दुपारच्या दरम्यान जाहीर भाषणामधून पुन्हा त्यांनी त्याच मुद्द्यावर भाष्य केलं.

जाहीर भाषणात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, मी एक बाप म्हणून, नवरा म्हणून कमी पडलो.. श्रीकांतच्या भाषणातून डोळे उघडले. त्याला कुणी विचारलं, आई-वडिलांसोबतच्या आठवणी सांग, तर माझ्यासोबतच्या त्याच्या आठवणी कमी आहेत. कारण मी घरी जायचो तेव्हा सर्व झोपलेले असायचे. आमची पंधरा-पंधरा दिवस भेट व्हायची नाही.

शिंदे पुढे म्हणाले, कालच्या भाषणात तो (श्रीकांत) वस्तुस्थिती बोलून गेला.. तुम्हाला तो परिवार समजतो म्हणून बोलून गेला.. माझ्या बापाचा मला अभिमान आहे, असंही तो बोलला. मलाही त्याचा अभिमान आहे. मात्र आता संपूर्ण शिवसेना आपला परिवार आहे. संपूर्ण राज्य आपला परिवार आहे. केवळ माझं कुटुब माझी जबाबदारी नाही. माझ्या कामाचं रहस्य ही लोकांची गर्दी आहे, असं शेवटी एकनाथ शिंदे म्हणाले.

शिवसेना हेच माझं सर्वस्व होतं, शिवसैनिक हेच माझं कुटूंब होतं. आयुष्यभर मी त्यांच्यासाठी काम केलं. पुढे काय होईल याची मला अजिबात कल्पना नव्हती. नेहमी पुढचा विचार करणाऱ्या माझ्या मनाने मागे वळून कधी पाहिले नव्हते. पण आज श्रीकांतच्या मुखातून निघालेल्या शब्दांमधून मला माझा काल दिसला, असं मुख्यमंत्री म्हणाले.



## आदित्य ठाकरे ठाणे दौऱ्यावर, शाखांना भेटी देण्याबरोबरच पदाधिकाऱ्यांशी साधणार संवाद

**■ठाणे, विशाल कारंडे :**

शिवसेनेतील उठावाचे केंद्रबिंदू आणि सध्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे शहरावर ठाकरे गटाने लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लक्ष केंद्रीत केले असून रविवारी सायंकाळी ठाकरे गटाचे युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे हे ठाण्यातील शाखांना भेटी देऊन पदाधिकाऱ्यांची संवाद साधणार आहेत. या निमित्ताने ठाकरे गटाकडून शक्तीप्रदर्शन करण्याची तयारी सुरू आहे. ठाणे जिल्हा हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यातील पालिकांवर आजवर शिवसेनेची सत्ता कायम राहिली आहे. शिवसेनेतील उठावानंतर जिल्ह्यातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मोठे समर्थन मिळाले असून सद्यस्थितीत मुख्यमंत्र्यांचा बालेकिल्ला म्हणून ठाणे जिल्हा ओळखला जात आहे. शिवसेनेतील उठावानंतर पहिल्यांदाच लोकसभेची निवडणुक होणार असून त्यासाठी शिंदे गटाकडून जोरदार तयारी सुरू आहे. ठाणे लोकसभा मतदार संघाचे खासदार राजन विचारे हे ठाकरे गटात आहेत. ही जागा पुन्हा जिंकण्यासाठी ठाकरे गटाकडून व्युहरचना आखली जात असून ठाकरे गटाने आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरावर लक्ष्य केंद्रीत केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून रविवारी सायंकाळी ५ वाजता ठाकरे गटाचे युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे हे ठाण्यात येणार आहेत. ठाण्यातील आनंदनगर, मनोरमानगर, चंदनवाडी आणि जिजामातानगर या शाखांना आदित्य हे भेटी देणार असून तेथील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या निमित्ताने ठाकरे गटाकडून शक्तीप्रदर्शन करण्याची तयारी सुरू आहे.

## दिल्लीत भाजपाचे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन; नरेंद्र मोदीही अधिवेशनाला राहणार उपस्थित



**■ नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**

देशात आतापासून आगामी लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु झाली आहे. फेब्रुवारीच्या अखेरीस किंवा मार्चच्या सुरुवातीच्या आठवड्यात आचार संहिता लागू होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजपासह विरोधी पक्षांनी तयारी सुरू केली आहे. यादरम्यान भाजपाचे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन दिल्लीत सुरू होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीही या अधिवेशनाला उपस्थित राहणार असून पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. यावेळी नरेंद्र मोदी भाजपाच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना लोकसभा निवडणुकीतील विजयाचा मंत्रही देतील. तसेच, या अधिवेशनात दोन प्रस्तावही मांडले जाणार असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. लोकसभा निवडणूक-2024 मध्ये भाजपने 370 जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भाजपाचे राष्ट्रीय अधिवेशन शनिवारपासून सुरू होणार असून रविवारपर्यंत चालणार आहे. अधिवेशनात प्रामुख्याने लोकसभा निवडणूक-2024 च्या रणनीतीवर विचारमंथन होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुका तोंडावर आलेल्या असताना भाजपाचे राष्ट्रीय अधिवेशन दिल्लीत होणार आहे. भाजपाचे हे राष्ट्रीय अधिवेशन दुपारी ३ वाजता सुरू होणार आहे. या अधिवेशनात इतर मुद्द्यांवर चर्चेसोबतच मोदी सरकारच्या कार्यकाळातील कामगिरीवरही चर्चा होण्याची शक्यता आहे. हे राष्ट्रीय अधिवेशन दोन दिवस चालणार आहे. दिल्लीत भाजपाचे राष्ट्रीय अधिवेशन सुरू होत आहे. सूत्रांचे म्हणणे आहे की, राष्ट्रीय बैठकीत दोन प्रस्ताव मांडले जाऊ शकतात. पहिला राम मंदिर आणि दुसरा प्रस्ताव विकसित भारत : मोदींची गॅरेंटीचा असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या अनेक सभांमध्ये या गॅरंटीचा उल्लेख केला आहे. दुसरीकडे अयोध्येत राम मंदिराचे औपचारिक उद्घाटन झाले आहे. जानेवारी महिन्यात एका भव्य कार्यक्रमात अयोध्येत नव्याने बांधलेल्या राम मंदिरात प्रभू रामललाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

## आता शरद पवार 'ॲक्शन मोड'वर; म्हणाले, 'पक्षाची, चिन्हाची चिंता...'



चिन्हाची फार चिंता करायची नाही. आजपर्यंत मी १४ वेळा निवडणुका लढलो. त्यापैकी पाच निवडणुकांचे चिन्ह हे बैलजोडी, गाय वासरू, चरखा, हाताचा पंजा आणि घड्याळ, अशी होती. मात्र, चिन्ह काढून घेतले म्हणजे त्या संघटनेचा अस्तित्व संपेल, असे कधी घडत नाही.

-शरद पवार, ज्येष्ठ नेते

**■पुणे, अभिजित येरल्लू :**

ज्याने पक्ष स्थापन केला, त्याचा पक्ष काढून घेतला, असे यापूर्वी देशात कधी झाले नव्हते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसच्या निमित्ताने असे प्रथमच घडले आहे. मात्र संघटनेचे चिन्ह किंवा पक्ष गेल्यामुळे अस्तित्व संपत नाही. पुन्हा नव्या जोमाने आपण राज्यात संघटना बांधणार आहे, असा निर्धार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शनिवारी व्यक्त केला. बारामतीतील गोविंद बाग या त्यांच्या निवासस्थानी माळशिरस तालुक्यातील काही कार्यकर्त्यांनी शरद पवार यांच्या गटात प्रवेश केला. त्यावेळी पवार यांनी हा निर्धार बोलून दाखवला. पवार म्हणाले, की यापूर्वी देशामध्ये अनेकदा पक्षाच्या संदर्भात घडामोडी घडल्या. ज्याने पक्ष स्थापन केला त्याचाच पक्ष काढून घेणे, हे कायद्याला धरून वाटत नाही. त्यामुळेच आम्ही सर्वोच्च न्यायालयात गेलो आहे. त्याचा योग्य निकाल लागेल, अशी अपेक्षा आहे. सामान्य माणसाशी संपर्क कायम वाढला पाहिजे. त्याला पण नव्याने काय देऊ शकतो, यावर विचार केला पाहिजे. त्यामुळे नव्याने वाटचाल करताना देखील फार अडचणी येणार नाहीत. आपण नव्या उमेदीने महाराष्ट्रात फिरून लोकांशी संपर्क साधून लोकांना भूमिका पटवून देणार आहोत. त्यामध्ये पक्ष आणि चिन्ह याची फारशी अडचण येणार नाही.

## भटक्या श्वानांच्या रेबीज प्रतिबंधक लसीकरणासाठी मुंबई महानगरपालिकेचे अभियान

**■ मुंबई, विशाल पाटील :**



भटक्या श्वानांच्या चाव्यामुळे माणसांना होणाऱ्या संक्रमणाचा धोका कमी करणे, तसेच श्वानांना आवश्यक आरोग्य सुविधा पुरवण्याच्या उद्देशाने मुंबई महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्यावतीने मुंबई रेबीज निर्मूलन प्रकल्प हाती घेतला आहे. याअंतर्गत विविध संस्थांच्या साहाय्याने मुंबई महानगरातील किमान ७० टक्के श्वानांचे रेबीज प्रतिबंधक लसीकरण मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. यापैकी आतापर्यंत २५ हजार श्वानांचे लसीकरण करण्यात आले आहे. वेगवेगळी उद्दिष्टे साध्य करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. विशेषतः रेबीजची लागण टाळून मानवी मृत्यू रोखणे, रेबीज विषाणूच्या प्रसाराचे चक्र तोडणे व त्याद्वारे भटक्या श्वानांच्या चाव्यामार्फत होणाऱ्या रेबीजच्या मानवी संक्रमणाचा धोका कमी करणे, प्राणी कल्याण संरक्षण करणे, रेबीजचा प्रसार कमी करून नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करणे आदी उद्दिष्टे महत्त्वाची आहेत. याबाबत पशुवैद्यकीय विभाग आणि देवनार पशुवधगृहाचे महाव्यवस्थापक डॉ. कलीमपाशा पठाण यांनी सांगितले की, सप्टेंबर २०२३ पासून मुंबई महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने मुंबई रेबीज निर्मूलन प्रकल्पाअंतर्गत भटक्या श्वानांच्या रेबीज प्रतिबंधक लसीकरणासाठी निरंतर अभियान हाती घेण्यात आले आहे. हे अभियान अविरतपणे सुरू आहे. रेबीज प्रतिबंधक लसीकरणासाठी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने जॅनीसी स्मिथ एनिमल वेल्फेअर ट्रस्ट, यूथ ऑर्गनायझेशन इन डिफेन्स ऑफ एनिमल्स, युनिव्हर्सल एनिमल वेल्फेअर सोसायटी आणि उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन या संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे.

## नेरुळ जेट्टीत तीन फ्लेमिंगोंचा नाम फलकावर आदळून मृत्यू; अनेक तक्रारी नंतर नामफलक हटविले

**■ नवी मुंबई, भावना जैन :**



नेरुळ जेट्टीजवळ विभागातले रहिवासी मॉर्निंग वॉकला गेले असताना त्यांना रस्त्यावर एक फ्लेमिंगो पक्षी जखमी अवस्थेत आढळून आला. प्रत्यक्षदर्शींनी त्वरित प्राणीमित्र संघटनांना पाचारण करून फ्लेमिंगोवर उपचार करण्यास सांगितले. परंतु फ्लेमिंगोंची अवस्था बिकट असल्याने उपचारा दरम्यानच फ्लेमिंगोचा मृत्यू झाला. असेच आणखी दोन नागरिकांना त्याच ठिकाणी काही अंतरावर दोन आणखी फ्लेमिंगो सापडले. त्यांच्यावरही उपचार करण्यात आले. परंतु ते दोन्ही फ्लेमिंगो पक्षी वाचू शकले नाहीत. नवी मुंबईत फ्लेमिंगो पक्षी येण्याचा मोसम सुरू झाला आहे. मोठ्या संख्येने हे फ्लेमिंगो विदेशातून भारतात भ्रमंती करत अन्नाच्या शोधात येत असतात. परंतु मोसमाच्या सुरुवातीलाच अपघाताने फ्लेमिंगो मृत पावण्याची ही तिसरी घटना घडली असल्याने पक्षी प्रेमींकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. गेल्यावर्षी फ्लेमिंगो अपघातत मृत पावल्याची एकच घटना घडली होती. मात्र, या वर्षात फ्लेमिंगो अपघाताच्या तीन घटना घडल्या असून १५ दिवसांच्या काळात ही दुसरी घटना घडल्याने पक्षी प्रेमी चिंतेत आहेत. वर्षभरात मोसमाच्या सुरुवातीला आता पर्यंत ७ फ्लेमिंगोंचा मृत्यू झाल्याची माहिती पक्षीप्रेमी संघटनांकडून मिळाली आहे. फ्लेमिंगोंचे थवे आकातून उडत येत असताना पाण्यात उतरतेवेळी नाम फलकाचा अंदाज न आल्याने फ्लेमिंगो नाम फलकावर आदळत असून त्यात त्यांचा मृत्यू होत असल्याची माहिती पक्षी प्रेमी आणि सेव्ह नवी मुंबई एन्व्हायरमेन्ट संस्थेचे अध्यक्ष सुनील अगरवाल यांनी दिली. या बाबत त्यांनी व त्यांच्या संस्थेने सिडको प्रशासनकडे वारंवार तक्रारी देखील दाखल केल्या आहेत.

## चिपळूणमध्ये सरकारच्या आशीवार्दाने बाहेरील गुंड मागवून राडा; विजय वडेट्टीवारांचा आरोप

**■ मुंबई, दिगंबर जाधव :**



चिपळूणमध्ये सरकारच्या आशीवार्दाने बाहेरील गुंड मागवून राडा करण्यात आला. राडा संस्कृतीला सरकारकडून खतपाणी घातले जात आहे. त्यामुळे राज्यातली कायदा सुव्यस्था धाब्यावर आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधीला सत्तेचा माज असल्याने हा राडा केला असून हा सत्तेचा माज जनताच उतरवेल. महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेला सत्ताधारी लोकप्रनिधींकडून वारंवार गालबोट लावले जात आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधी वारंवार समाज विघातक कृत्ये करत असल्याने महाराष्ट्राची प्रतिमा मलिन होत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. त्याचबरोबर लोकप्रतिनिधीचा बुरखा पांघरून दहशत निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीचा त्यांनी निषेध केला आहे. चिपळूणमध्ये शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर पोलिसांनी कडक कारवाई करणे अपेक्षित आहे. परंतु तसे न करता या गुंडांना पाठीशी घातले जात आहे. पोलिस एकतर्फी कारवाई करत आहेत. चिपळूणची संस्कृती बिघडवण्याचा हा प्रयत्न आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर आमदार भास्कर जाधव यांच्या संपर्क कार्यालयासमोरच मुद्दाम गोंधळ घातला गेला. यासाठी बाहेरून गुंड, हत्यारे मागविण्यात आली. हे सगळं कोणाच्या आशीवार्दाने सुरु आहे. हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने कडक कारवाई करावी, अशी मागणी देखील वडेट्टीवार यांनी केली आहे.

चिपळूणमध्ये पोलिस कर्मचारीही जखमी झाले. या दगडफेकीत काहींच्या डोक्याला, हाताला, तोंडाला गंभीर दुखापत झाली. जमावास पांगवताना झालेल्या लाठीमाराचा फटका एका पत्रकारासही बसला. त्याच्या हाताला गंभीर दुखापत झाली.

## मंगळवारपासून वसई ते भाईंदर रोरो बोट सुरु होणार; महाराष्ट्र सागरी महामंडळाची घोषणा



सध्या ही फेरीबोट सेवा प्रायोगिक तत्त्वावर सुरु होणार असली तरी, वाहतूककोंडीचा सामना करीत वसई ते भाईंदर असा रस्त्याने प्रवास करणाऱ्या लोकांना वेळ व इंधनाची बचत करणारा, प्रदूषणमुक्त, पर्यावरणस्नेही व आरामदायी असा जलवाहतूक सेवेचा पर्याय उपलब्ध होणार असल्याने जनतेसाठी ही सेवा नक्कीच दिलासादायक ठरेल - डॉ. माणिक गुरसळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

**■ वसई, नितीन देवळेकर :**

महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत वसई खाडीमध्ये वसई ते भाईंदर दरम्यान सध्या 'प्रायोगिक तत्त्वावर' रो-रो प्रवासी फेरीबोट सेवा २० फेब्रुवारी २०२४ पासून सुरु करण्यात येत आहे. ह्या रोरो बोटीचे सुरक्षित व सुलभ नौकानयन, जेट्टी व बोटीमधून प्रवासी आणि वाहनांची सुलभ चढ-उत्तार आणि सुयोग्य नौकानयन मार्ग या सर्व बाबींची खात्री झाल्यानंतर, ह्या फेरीबोट सेवेचा लोकार्पण सोहळा औपचारिकरित्या करण्यात येणार आहे. अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या ह्या रो-रो फेरीबोट सेवेमुळे भाईंदर आणि वसई ही शहरे एकमेकांशी जलमार्गाने जोडली जाणार आहेत. मेसर्स सुवर्णदुर्ग शिपींग अँड मरीन सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीस ही रो-रो फेरीबोट सेवा चालविण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने परवानगी दिली असून, एकाच फेरीत १०० प्रवासी आणि ३३ गाड्या वाहून नेण्याची फेरीबोटीची क्षमता आहे. ह्या कंपनीला कोकण किनारपट्टीवर राजपुरी, बाणकोट, दाभोळ आणि जयगड या खाड्यांमध्ये रो-रो फेरीबोट सेवा चालविण्याचा अनेक वर्षांचा अनुभव आहे. या रोरो बोटीची वाहन क्षमता ५० दुचाकी, ३० चारचाकी वाहनांची असणार आहे. तसेच प्रवासी क्षमता १०० पेक्षा जास्त असणार आहे. या मिनी रोरो बोटीची किंमत ६.२ कोटी रुपयांची असून कंपनीने रोरो बोटीला जान्हवी असे नाव ठेवण्यात आले आहे. वसई ते भाईंदर सकाळी व गर्दीच्यावेळी येताना वाहन चालकांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. वसई ते भाईंदर रस्ते मार्गे साधारण ३८.२० किलोमीटर आहे. वाहनांना रस्ते मार्गाने हे अंतर पार करण्यासाठी सव्वा तास ते दीड तास कालावधी लागतोय.

## बुल शार्क माशाच्या हल्ल्यानंतर तज्ञांनी व्यक्त केली भीती



**■पालघर, सचिन कदम :**

जिल्ह्यात वैतरणा नदीपात्रातून बुल शार्क माशाने तरुणावर हल्ला केल्यानंतर तज्ज्ञांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. जागितक तापमानवाढ, समुद्राच्या पाण्याचे वाढते तापमान, समुद्रातील माशांचे कमी झालेले प्रमाण, बेसुमार होत असलेली मासेमारी या कारणांमुळे समुद्रातील मासे नदीत शिरण्याच्या कारणांचा शोध घेतला जात आहे. वैतरणा नदीमध्ये आलेल्या बुल शार्क माशामुळे आता मुंबईलाही असा धोका उद्भवू शकतो, हे लक्षात आल्याचे क्लायमेट रिॲलिटी प्रकल्पाच्या राष्ट्रीय समन्वयक प्रा. डॉ. नंदिनी देशमुख यांनी सांगितले. जागतिक तापमानवाढीमुळे प्राण्यांच्या, जलचरांच्या पुनरुत्पादनाचे स्वरूप बदलू लागले आहे. तसेच पाण्याचे तापमान वाढत असल्याने या प्राण्यांच्या भ्रमणाचेही मार्गही बदलू लागले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. पालघर येथील समुद्रीविज्ञान विषयाचे अभ्यासक प्रा. भूषण भोईर यांनी, भविष्यात बुल शार्कसारख्या माशांमुळे होणारे हल्ल्यासारखे धोके वाढू शकतात, असा इशारा दिला. समुद्रातील इतर मासे गोड्या पाण्यात मरून जातात. मात्र बुल शार्कसारखा मासा शरीरातील अतिरिक्त युरियाच्या बळावर गोड्या पाण्यात तग धरू शकतो, असे सांगून गंगेच्या पात्रातही ५० किलोमीटर अंतरापर्यंत शार्क दिसल्याचे त्यांनी सांगितले. मानवी हस्तक्षेपामुळे समुद्रात भराव घालणे, समुद्र हटवणे असे प्रकारही सुरू आहेत. याचेही काही पडसाद उमटतील. पर्यावरणीय संतुलन बिघडले की त्याचे परिणाम शार्क नदीत शिरल्यासारख्या उदाहरणांमधून दिसत राहतात. त्याचा परिणाम मानवी जीवनावरही होतो. समुद्रात होणारी बेसुमार मासेमारी जलचरांनाच्या अन्न उपलब्ध होण्याच्या मार्गामध्ये अडथळा निर्माण करत आहे.

# ठाण्यातील अवैध दारू विक्रेत्यांना राज्य उत्पादन शुल्काचा दणका

## चार सराईतांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई




अवैध दारूची निर्मिती, विक्री आणि वाहतूक करणाऱ्या सराईत आरोपीवर एमपीडीए कायद्याअंतर्गत कारवाई केली जाते. या चौघांना नियमानुसार वेळोवेळी समज दिलेली होती. त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्रही घेतले होते. तरीही त्यांच्यातील गुन्हेगारी वागणुकीत काही सुधारणा आढळली नाही. त्यामुळे त्यांच्याकडून समाजविघातक कृत्य घडू नये, यासाठी खबरदारी म्हणून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली.

-डॉ. निलेश सांगडे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, ठाणे.

**■ठाणे, योगेश होळंब:**

अवैध दारूची विक्री आणि निर्मिती करणाऱ्या सराईत दारू विक्रेत्यांना ठाण्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने चांगलाच दणका दिला आहे. समाजविघातक कृत्य करणाऱ्या चौघांवर या विभागाने एमपीडीए कायद्यातर्गत कारवाई केल्याने त्यांची थेट कारागृहात रवानगी झाल्याची माहिती ठाण्याचे अधीक्षक डॉ. निलेश सांगडे यांनी दिली. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध दारूची विक्री, निर्मिती करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई केली जाते. अशा गुन्हेगारी लोकांमुळे समाजातील सुरक्षा धोक्यात येते. समाजात समाजविघातक कृत्ये घडण्याचा धोका संभवतो. त्यामुळे त्यांच्यावर एमपीडीए कायद्याअंतर्गत कारवाई केली जाते. ठाण्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. निलेश सांगडे यांनी समाजविघातक कृत्य करणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील ११ जणांची यादी तयार करून त्यातील चौघांवर एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई करण्यास परवानगी देण्याची मागणी ठाणे न्यायालयात केली होती. सादर केलेल्या साक्षी पुरावांच्या आधारे न्यायालयाने चक्कमसरी आकाश (उल्हासनगर), रूपा उबाळे (पिसवली कल्याण), भास्कर रंगय्या कासम (भिवंडी) आणि सैजात मुस्तफा खान (उल्हासनगर) या चार जणांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश दिले.

//सुविचार
जीवनात कितीही वाईट प्रसंग येउद्या, चांगलं वागणं कधीच सोडू नका, विजय हा नेहमी सत्याचाच होतो. //



## ओपनफेस सँडविच

**तेच** तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. खास करून मुलांच्या डब्यात काय पदार्थ द्यावे हे सुचत नाही. पोळीभाजी नको, पराठे खाऊन कंटाळा आला, सँडविच काय तेच तेच.. मग असे करायचे की हे पदार्थ वेगळ्या रूपात द्यायचे. आता सँडविच. नेहमीचे कसे असते, बटाटा, चटणी, काकडीबरोबर नाही का! मग सँडविचला वेगळे रूप द्यायचे. नेहमीचे सँडविच बंद असते, हे ओपनफेस ठेवायचे.



**साहित्य** – उकडलेला बटाटा, सिमला मिरची, गाजर, फरसबी, चाट मसाला, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू, ब्रेड, चिझ किंवा बटर.

**कृती** – उकडलेला बटाटा किसून त्यात हवी तर सिमला मिरची, गाजर, फरसबी काहीही घाला. मात्र अत्यंत बारीक चिरून. आता यात हवा तो मसाला टाका. चाट मसाला, ड्राय हॅर्ब्स, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू रस चांगले एकत्र केले की ब्रेडचे लांबट तुकडे करा. त्यावर हे मिश्रण थापा. वरून चीझ किसून घाला अथवा थोडे बटर घाला. साधारण ग्रील करा किंवा तव्यावर शेकवून द्या. हे सँडविच मेयो किंवा चटणीसोबत खायला द्या.

### वॅक्सिंगऐवजी शेव्हिंगचा पर्याय वापरत असाल तर या गोष्टी ठेवा लक्षात
# शरीरावर जाड केस येणे होईल नाहीसे



आता लवकरच उन्हाळा सीझन सुरू होईल, समर वाइब्सनुसार आपणही शॉर्ट्स, क्युट ड्रेसेस घालून बाहेर पडण्याच्या विचारात असाल, अशावेळी पायावर जाड केस असले तर असे कपडे कसे घालू? असा प्रश्नही तुम्हाला साहजिक पडेलच. मग अगदी आयत्या वेळी पार्लरमध्ये जाण्याऐवजी आपण घरीच रेझर घेऊन शेव्हिंगचा पर्याय निवडाल, वास्तविक यात काही हरकत नाही, मात्र अनेकदा शेव्हिंगमुळे पुन्हा अंगावर येणारे केस हे नियमित लवेपेक्षा जाडसर येतात आणि पुढच्या वेळी हेच केस पुन्हा काढून टाकताना त्वचेला त्रास होतो. असं होऊ द्यायचं नसल्यास तुम्हाला शेव्हिंगवेळी फक्त काही सोप्या टिप्स लक्षात ठेवण्याची गरज आहे. अनेक महिलांना वॅक्सिंगमुळे त्रास होतो, तर हेअर रिमूव्हल क्रीम्समुळे त्वचा काळवंडते, असाही काहींचा अनुभव असतो, यावर पर्याय म्हणून रेझरचा वापर हा त्यातल्या त्यात सेफ म्हणता येईल. फक्त रेझर योग्य पद्धतीने वापरला जातोय का, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही योग्य पद्धत कोणती आणि शेव्हिंग करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवावयाच्या, हे जाणून घ्या..



**कसा वापराल रेझर?**

रेझर फिरवताना ज्या दिशेने केस येतात त्या दिशेनेच फिरवा, यामुळे केस मुळासकट निघून जायला मदत होते आणि पुढील वेळेस जाड केस येत नाहीत. रेझर फिरवताना दुखापत होईल इतका जोर लावू नका. हात, पाय, अंडरआर्म्स, गुप्तांग अशा सर्वच ठिकाणी एकच रेझर वापरू नका. ब्लेड चेंज करणारे रेझर वापरत असाल तर एखादे ब्लेड तीन ते जास्तीत जास्त चार वेळा वापरा. त्यावर नको. शेव्हिंग प्रोसेस सोपी करतील असे मार्ग -

■ जो भाग शेव्ह करायचा आहे तो पाण्याने भिजवा यामुळे केस नरम होतील.

■ हात किंवा पाय, अंडरआर्म्स, प्रायव्हेट पार्टवरील केस काढायचे असतील तरी आधी त्यावर कमी केमिकल्स असलेले शेव्हिंग फोम वापरा, मगच केसांवर रेझरचा वापर करा. यामुळे केस नरम होतात आणि पटकन निघून जातात. शेव्हिंग केल्यानंतर तुमच्या त्वचेची छिद्रे उघडतात. त्यात धूळ जाऊ नये किंवा कोरडेपणा येऊ नये, रेडनेसचा त्रास होऊ नये म्हणून चांगले मॉइश्चरायझर त्वचेला लावा.

■ शेव्ह केल्यानंतर आधी तुम्ही तुमच्या अंडरआर्म्सला ॲलोवेरा जेल किंवा बर्फ लावा.

आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी, आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यांमध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते. रिफाईन्ड साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह, इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे.

### मिठाई बनवताना साखरेऐवजी
# वापरा खजुराची पेस्ट



**आहारामध्ये** साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे, इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात.

नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो. खजुराची विशेषता अशी की त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत. शंभर ग्रॅम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेऐवजी वापरली जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.


दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी.

या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध, किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला वेगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत.

त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

**मनुके खाण्यास जेवढे स्वादिष्ट आहेत, तेवढेच अन्य ड्रायफ्रुटच्या तुलनेत स्वस्त देखील आहेत. मनुक्यांचा वापर अनेकदा गोड पदार्थांमध्ये केला जातो. याचा स्वाद पदार्थाला चवदार बनवतो. याव्यतिरिक्त मनुके खाण्याचे अनेक फायदे आहेत. हे फायदे जाणून घेऊया...**

# जाणून घ्या फायदे मनुके खाण्याचे



**शरीराला ताकद मिळते –** दररोज मनुके खाल्ल्याने शरीराला ताकद मिळते. मनुक्यात नैसर्गिक साखर असते, जी सहज पचते. यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. मनुक्यात कोलेस्ट्रॉल नसते, ज्यामुळे हृदयाची समस्या असलेल्या रुग्णांसाठी हे चांगले आहे.

**बद्धकोष्ठता असणाऱ्यांसाठी फायदेशीर –** जर तुम्हाला बद्धकोष्ठता असेल तर मनुके खूपच फायदेशीर आहेत. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी मनुके एकप्रकारचे वरदान आहे. मनुक्यांना भिजवून खाल्ल्याने अधिक फायदा होतो.

**वजन कमी करण्यासाठी –** मनुक्यातील नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला नुकसान पोहचवत नाही. यामुळे याचे नियमित सेवन केल्याने तुमचे वजन देखील कमी होते.

**हाडे मजबूत होतात –** हाडे मजबूत करायची असतील तर मनुक्यांचे सेवन नक्की करा. मनुक्यात कॅलिशियमचे प्रमाण अधिक असते.

# फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

तुमचा फोन चोरीला गेल्यास सर्वप्रथम तुमचं सिम कार्ड ब्लॉक करा. तसेच मोबाईल बँकिंग, यूपीआय पेमेंट आणि मोबाईल वॉलेट ब्लॉक करा. फोन चोरी झाल्याची तक्रार नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये करायला विसरू नका.

**हल्ली** चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

**सिम कार्ड ब्लॉक करा**

फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते ॲप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून ॲक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

**मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा**



फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग ॲप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणीतही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणे उत्तम.

**यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा**

जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो. त्यामुळे थोडासाही वेळ न दवडता यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा. यासाठी तुम्हाला तुमच्या बँकेशी संपर्क साधावा लागेल.

**सर्व मोबाईल वॉलेट्स ब्लॉक करा**

मोबाईल वॉलेट्समुळे आयुष्य सोपं झालंय, परंतु जर तुमचा फोन चुकीच्या हाती पडला तर गुगल पे आणि पेटीएमसारखे मोबाईल वॉलेट महागात पडू शकतात. संबंधित ॲपच्या हेल्प डेस्कशी संपर्क करा आणि जोपर्यंत तुम्ही नवीन डिव्हाइसवर वॉलेट पुन्हा सेट करत नाही, तोपर्यंत ते ब्लॉक करण्यास सांगा.

**पोलिसांत तक्रार करा**

या सर्व स्टेप्स फॉलो केल्यावर पोलीस अधिकाऱ्यांना तुमच्या चोरी झालेल्या डिव्हाइसची माहिती द्या. तुम्ही जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये फोन चोरी झाल्याची तक्रार करू शकता आणि एफआयआरची प्रत त्यांच्याकडून घेऊ शकता. जर तुमच्या फोनचा गैरवापर झाला किंवा तुमच्या फोनच्या माध्यमातून पैसे चोरीला गेले तर ही कॉपी पुरावा म्हणून वापरता येईल.

## वाणी ज्ञानेश्वरांची

नातरी आकाशाचे खोपें । वायु निवांतुचि लोपे । कां तरंगता हारपे । जळीं जेवीं ॥

अथवा आकाशाच्या पोकळीत ज्याप्रमाणे वायु नाहीसा होतो किंवा पाण्यात उत्पन्न झालेल्या लाटा पाण्यातच नाहीशा होतात, अथवा जागिनलिये वेळे । स्वप्न मनींचें मनीं मावळे । तैसें प्राकृत प्रकृतीं मिळे । कल्पक्षयीं ॥

किंवा जागे झाल्यावर मनातले स्वप्न मनातच मावळते, त्याप्रमाणे महाकल्पाच्या शेवटी प्रकृतीपासून उत्पन्न झालेली सर्व भूते प्रकृतीतच मिळतात. मग कल्पादीं पुढती । मीचि सृजीं ऐसी वदंती । तरी इयेविषयीं निरुती । उपपत्ती आइक ॥

मग सृष्टीच्या आरंभी पुनः ती मीच निर्माण करितो, अशी जी शास्त्रात बोलवा आहे, तीविषयीची खरी स्थिती तुला सांगतो, ती ऐक. तरी हेचि प्रकृती किरीटी । मी स्वकीया सहजें अधिष्टीं । तेथ तंतूसमवाय पटीं । जेविं विणावणी दिसे ॥

तर अर्जुना, याच माज्या प्रकृतीचा मी जेव्हा सहज अंगीकार करितो, तेव्हा वस्त्राच्या विणीमध्ये तुंतूंचा जसा संबंध दिसतो, मग तिये विणावणीचेनि आधारें । लहाना चौकडिया पटत्व भरे । तैसी पंचात्मकें आकारें । प्रकृतीचि होयें ॥

आणि मग त्या विणकरीच्या आधाराने जसे लहानलहान चौकड्यांनी वस्त्र बनते, त्याप्रमाणे पंचमहाभूतांच्या आकाराने प्रकृतीच बनते, जैसें विरजणियाचेनि संगें । दुधचि आटेजों लागे । तैशी प्रकृति आंगा रिगे । सृष्टिपणाचिया ॥

ज्याप्रमाणे विरजणाच्या संगतीने (संबंधाने) दूधच आटू लागते (घट्ट होऊ लागते), त्याप्रमाणे प्रकृती सृष्टीच्या आकाराने परिणाम पावू लागते. स्वतः प्रकृतीच सृष्टी बनू लागते. बीज जळाची जवळीक लाहे । आणि तेंचि शाखोपशाखीं होये । तैसें मज करणें आहे । भूतांचें हें ॥

(पाणी हे जसे निमित्त आहे) ज्याप्रमाणे, पाण्याच्या सान्निध्याने बीजाला फांद्या वगैरे फुटून त्याचे झाड होते, त्याप्रमाणे प्रकृतीचा पसारा माज्यामुळे होतो. (तसाच मी सृष्टीचे निमित्त आहे.)

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - १०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 4 | 9 | | | 1 | 3 | | 2 |
| | 2 | | 6 | | | 4 | | |
| 6 | | 3 | 9 | | 4 | 1 | 7 | |
| 2 | | | | 8 | | | | 3 |
| | | | 1 | | | | 9 | |
| | | 4 | | 6 | | | | |
| | 3 | | 2 | | 8 | | | |
| | | | | 3 | | 8 | 1 | |
| | 7 | 8 | 5 | 9 | | 2 | | |

### उत्तर सुडोकू - ९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 9 | 4 | 6 | 1 | 5 | 3 | 7 | 8 |
| 5 | 3 | 7 | 9 | 2 | 8 | 1 | 4 | 6 |
| 6 | 8 | 1 | 4 | 3 | 7 | 9 | 2 | 5 |
| 7 | 6 | 5 | 1 | 4 | 9 | 2 | 8 | 3 |
| 9 | 1 | 2 | 5 | 8 | 3 | 4 | 6 | 7 |
| 8 | 4 | 3 | 2 | 7 | 6 | 5 | 9 | 1 |
| 1 | 2 | 8 | 3 | 6 | 4 | 7 | 5 | 9 |
| 3 | 5 | 6 | 7 | 9 | 2 | 8 | 1 | 4 |
| 4 | 7 | 9 | 8 | 5 | 1 | 6 | 3 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.



## 'उडने की आशा' मालिकेच्या 'प्रोमो'ला अभिनेता उपेंद्र लिमये यांचा आवाज

प्रेक्षकांसमोर दर्जेदार मालिका सादर करण्याची आपली परंपरा कायम ठेवत, स्टार प्लस वाहिनीने आजवर स्पर्श न केलेल्या आणखी एका विषयाला हात घातला आहे आणि उडने की आशा ही नवी मालिका सादर केली आहे. या मालिकेत कंवर ढिल्लन (सचिन) आणि नेहा हसोरा (सायली) यांच्या प्रमुख भूमिका आहेत. स्टार प्लस वाहिनीवरील उडने की आशा या मालिकेत सचिन आणि सायली यांच्या प्रेमाची गाथा आणि नातेसंबंधांची गुंतागुंत पाहायला मिळणार आहे. स्टार प्लस वाहिनीवर सादर होणाऱ्या उडने की आशा या मालिकेतून एका पत्नीच्या भावभावनांच्या कल्लोळाचे चित्रण करण्यात आले आहे. ती तिच्या बेफिकीर पतीचे जबाबदार व्यक्तीत कसे परिवर्तन करते आणि याचा काही प्रमाणात संपूर्ण कुटुंबावर कसा परिणाम होतो, यावर बेतलेले हे नाट्य प्रेक्षकांना खिळवून ठेवेल. कंवर ढिल्लन याने सचिनची भूमिका साकारली आहे, जो एक टॅक्सी ड्रायव्हर आहे, तर नेहा हसोराने ह्यउडने की आशाह्व या मालिकेत सायली या फुलविक्रेतीची भूमिका साकारली आहे, जी वेगवेगळे छोटे व्यवसाय करत, या कामांतून आपला उदरनिर्वाह करते.

## 'दंगल'मधील ज्युनियर बबिताचे निधन

बॉलिवूडमधील सुपरहिट चित्रपट दंगल मधील अभिनेत्री सुहानी भटनागरचं निधन झालं आहे. सुहानीने वयाच्या 19 व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. खरं तर, काही दिवसांपूर्वी सुहानीचा मोठा अपघात झाला होता, त्यात तिचा पाय फ्रॅक्चर झाला होता. सुहानीने उपचारासाठी घेतलेल्या औषधांचे दुष्परिणाम झाले आणि तिच्या शरीरात हळूहळू पाणी साचले. मृत्यूचे कारण संपूर्ण शरीरात पाणी भरल्याने असल्याचे सांगितले जात आहे. तिला दिल्लीतील एम्स रुग्णालयात बराच काळ दाखल करण्यात आले होते. परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. ही बातमी समोर येताच अनेकजण हळहळ व्यक्त करत आहेत. सुहानी भटनागर बॉलिवूडमधील प्रसिद्ध बालकलाकार होती. तिने 2016 मध्ये प्रदर्शित झालेल्या आमिर खानच्या दंगल चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या चित्रपटात सुहानीने ज्युनियर बबिता फोगाटची भूमिका साकारली होती. या चित्रपटातील तिच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले होते. तिने अनेक टीव्ही जाहिरातींमध्येही काम केले होते. दरम्यान, या चित्रपटानंतर सुहानीला अनेक चित्रपटांमध्ये काम करण्यासाठी ऑफर्स आल्या होत्या, पण शिक्षणामुळे तिने चित्रपटांपासून काही काळ दूर राहण्याचा निर्णय घेतला होता.



## दिनविशेष

### १८ फेब्रुवारी

- १९६५: गांबिया देशाला इंग्लंडकडून स्वातंत्र्य मिळाले.
- १९७९: सहारा वाळवंटाच्या दक्षिण अल्जीरियातील भागात बर्फ पडले. सहारा वाळवंटात बर्फ पडण्याची ही एकमेव नोंद आहे.
- १९९८: ज्येष्ठ गांधीवादी नेते, माजी केंद्रीय मंत्री व महाराष्ट्राचे माजी राज्यपाल सी. सुब्रमण्यन यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.
- २००१: संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांना मध्यप्रदेश सरकारचा लता मंगेशकर पुरस्कार प्रदान.
- १४८६: योगी चैतन्य महाप्रभू यांचा जन्म. (मृत्यू: १५ जून १५३४)
- १७४५: बॅटरी चा शोध लावणारे इटालियन भौतिकशास्त्रज्ञ अलासांड्रो व्होल्टा यांचा जन्म. (मृत्यू: ५ मार्च १८२७)
- १८२३: पत्रकार, समाजसुधारक व इतिहासकार रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १८९२)
- १८३६: स्वामी विवेकानंदांचे गुरू रामकृष्ण खुदिराम परमहंस तथा गदाधर चट्टोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑगस्ट १८८६ झ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
- १८७१: थोर देशभक्त, राजकीय नेते आणि हिंदुस्थानच्या केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले भारतीय अध्यक्ष बॅ. विठ्ठलभाई पटेल यांचा जन्म. (मृत्यू: २२ ऑक्टोबर १९३३)
- १८८३: क्रांतिवीर मदनलाल धिंग्रा यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑगस्ट १९०९)
- १८९८: फेरारी रेस कार निमार्ते आणि ड्रायव्हर एन्झो फेरारी यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑगस्ट १९८८)
- १९११: ऐतिहासिक कादंबरीकार कॅप्टन वासुदेव श्रीपाद बेलवलकर यांचा जन्म. (मृत्यू: २९ जून २०००)
- १९१४: ऊर्दू शायर व गीतकार जान निसार अख्तर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑगस्ट १९७६)
- १९२६: अभिनेत्री नलिनी जयवंत यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर २०१०)
- १९२७: संगीतकार मोहम्मद झहूर खय्याम हाश्मी ऊर्फ खय्याम यांचा जन्म.

## भविष्य

**मेष** – धार्मिक ग्रंथांचे वाचन कराल. कर्तृत्वाने मान मिळवाल. उपासनेला बळ मिळेल. गुरुकृपेचा लाभ होईल. सरकारी कामात वेळ जाईल.

**वृषभ** – चांगला आर्थिक लाभ होईल. काटकसरीने वागाल. जोडीदाराच्या शांत स्वभावाचे कौतुक कराल. कर्ज-प्रकरणे तूर्तास टाळावीत.

**मिथुन** – उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल. जोडीदाराच्या सुशिक्षितपणाने भारावून जाल. इतरांचे कौतुक करण्याचे विसरू नका.

**कर्क** – नातेवाईकांची मदत होईल. अपचनाचा त्रास जाणवू शकतो. खाण्या पिण्याची पथ्ये पाळावीत. भावनांना मुरड घालावी. मुलांच्या स्वछंदीपणाकडे लक्ष ठेवा.

**सिंह** – विलंबावर मात करा. वेळेचे महत्व लक्षात घ्यावे. शैक्षणिक गरज भागेल. बक्षिसास पात्र व्हाल. अचानक धनलाभ संभवतो. व्यावसायिक देवाण-घेवाण वाढेल.

**कन्या** – उत्तम वाहन सौख्य लाभेल. नातेवाईकांचा सहवास मिळेल. मानसिक शांतता राहील. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. भागीदारीत सलोखा वाढेल.

**तुला** – वाचनाची आवड पूर्ण होईल. घरात तुमचे प्रभुत्व राहील. आशावादी दृष्टीकोन ठेवाल. तात्विक वादात अडकू नका. हातातील अधिकार योग्य प्रकारे वापरा.

**वृश्चिक** – सांपत्तिक स्थैर्य लाभेल. व्यापार्यांना चांगला धनलाभ होईल. तुमची कमाई वाढेल. उष्णतेचा त्रास जाणवेल. प्रतिकूलतेतून मार्ग काढावा.

**धनु** – आशावादी दृष्टीकोन ठेवाल. सामाजिक कार्यात हिरीरीने भाग घ्याल. व्यवसायात प्रगती करता येईल. स्वतःचा मान राखाल. तर्कनिष्ठ बुद्धी वापराल. मित्र-मैत्रिणींशी संवाद करताना जपून बोला.

**मकर** – शांततेने विचार कराल. दान-धमार्चे महत्व समजावून द्याल. इतरांना मदत करण्यात आनंद मानाल. काही कामांत क्षुल्लक अडचणी येऊ शकतात. मुलांच्या प्रश्नांकडे लक्ष द्याल.

**कुंभ** – आध्यात्मिक क्षेत्रांतील व्यक्तींची गाठ पडेल. मोठ्या लोकांच्या ओळखीचा लाभ घेता येईल. व्यावहारिक दृष्टीकोन ठेवाल. काटकसरीने वागाल. आर्थिक गरज पूर्ण होईल. नोकरदार वर्गाला हक्काचे यश मिळेल. आर्थिक बाबतीत वाटणारी चिंता मिटेल.

**मीन** – व्यावसायिक चिंता मिटेल. हातात विशेष अधिकार येतील. वडीलांचे उत्तम सहकार्य लाभेल. व्यावसायिक ठिकाणी कौतुकास पात्र व्हाल. घरातून उत्तम सहकार्य लाभेल. राजकीय क्षेत्रात काम करताना वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. संततीसौख्य लाभेल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# शिकवणी वर्गांच्या फसव्या जाहिराती रोखणार!

## ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने कसली कंबर | मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा जाहीर




■ **नवी दिल्ली** : देशात अनिर्बंध फोफावलेल्या शिकवणी वर्गांसाठी (कोचिंग क्लास) केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकतीच नियमांची चौकट आखून दिली असून, आता या शिकवणी वर्गांच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिराती रोखण्यासाठी केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने (सीसीपीए) कंबर कसली आहे.

प्राधिकरणाने या मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा 'कन्झुमरअफेअर्स डॉट इन' या संकेतस्थळावर जाहीर केला असून, त्याबाबत जनतेची मतेही मागवली आहेत. येत्या १६ मार्चपर्यंत नागरिकांनी आपली मते, टिप्पण्या वा अभिप्राय केंद्रीय प्राधिकरणास पाठवायचे आहेत. सदर मार्गदर्शक तत्त्वांच्या मसुद्यात 'शिकवणी' म्हणजे शिकवणी वर्ग, सूचना किंवा शैक्षणिक सहाय्य किंवा शिक्षण कार्यक्रम किंवा कोणत्याही व्यक्तीने दिलेले मार्गदर्शन अशी व्याख्या केली आहे. शिकवणी वर्ग क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीला ही मार्गदर्शक तत्त्वे लागू केली जाणार असून, या क्षेत्रातील दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींपासून ग्राहकांचे संरक्षण करणे हा या मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश आहे, असे प्राधिकरणाने म्हटले आहे.

**...तर ती जाहिरात फसवी!**

अभ्यासक्रमाचे नाव (मग ते विनामूल्य असो किंवा सशुल्क) आणि यशस्वी उमेदवाराने निवडलेल्या अभ्यासक्रमाचा कालावधी किंवा ग्राहकांच्या त्यांच्या सेवा निवडण्याच्या निर्णयावर प्रभाव पाडू शकणारी इतर कोणतीही महत्त्वाची माहिती लपवणे, पडताळणीयोग्य पुरावा न देता कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेत यशस्वी होण्याचे प्रमाण, निवडीची संख्या किंवा विद्यार्थ्यांच्या क्रमवारीबाबत खोटे दावे करणे, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक प्रयत्नांची दखल न घेता, त्यांच्या यशाचे श्रेय केवळ शिकवणी वर्गाला देऊन फसवे प्रतिनिधित्व करणे, विद्यार्थ्यांमध्ये किंवा पालकांमध्ये चिंता वाढू शकेल असा तातडीची गरज असल्याचा फसवा भाव किंवा नापास होण्याची भीती निर्माण करणे, ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या किंवा ग्राहकांच्या स्वायत्ततेवर आणि निवडीवर परिणाम करणाऱ्या इतर कोणत्याही पद्धती यांचा वापर जाहिरातीत असेल तर ती फसवी, दिशाभूल जाहिरात मानली जाईल, असे या मार्गदर्शक तत्त्वांत नमूद करण्यात आले आहे.

# मुंबई-नाशिक महामार्गावर भीषण अपघात; दोघांचा जागीच मृत्यू



■ **कसारा** : मुंबई-नाशिक महामार्गावर उंबरमाळी गाव हद्दीत कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात २ जणांचा जागीच मृत्यू झाला असून २ जण जखमी आहेत. त्यात एकाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास मुंबई-नाशिक महामार्गावर असलेल्या हॉटेल ड्रिमलँड नजीक हा अपघात झाला.

शहापूर तालुक्यातील शिरोळ गावचे चौघे तरुण वॅगनर कारने शहापूरच्या दिशेने भरधाव वेगाने निघाले होते. दरम्यान, चालकाचा अचानक वाहनावरील ताबा सुटला. त्यामुळे गाडी उलटली आणि मोठ्या दगडांवर जाऊन जोरदार आदळली. दरम्यान, वाहनाचा वेग नियंत्रणापलीकडे असल्याने हा अपघात घडल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले.

चारचाकी वाहनाने प्रवास करणाऱ्या शिरोळ गावच्या ४ तरुणांपैकी अपघातात रवी धापटे, पप्पू भला या तरुणांचा जागीच मृत्यू झाला. तर स्वप्नील गावंडे व रवी बागडे हे दोघेजण जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक सागर जाधव यांनी आपल्या सहकारी पोलीस कर्मचाऱ्यांसोबत घटनास्थळी धाव घेऊन तत्काळ जखमींना पुढील उपचारासाठी रुग्णालयात हलवले. सद्यस्थितीत जखमींपैकी एक जण आसनगावस्थित क्रिस्टल केअर या खासगी रुग्णालयात दाखल असून, एकावर ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# एनआरआयसोबतच्या विवाहाची नोंदणी अनिवार्य करावी!

## विधी आयोगाची विधी मंत्रालयाकडे शिफारस



■ **नवी दिल्ली** : भारतीय नागरिक व अनिवासी भारतीय (एनआरआय) यांच्यातील विवाह नोंदणी अनिवार्य करण्याची शिफारस विधी आयोगाने विधी मंत्रालयाकडे केली. अशा विवाहाशी निगडित समस्यांवर तोडगा काढण्यासाठी व्यापक कायदा बनवण्याची गरजही आयोगाने आपल्या अहवालातून व्यक्त केली. अनिवासी, स्थलांतरित व भारतीय नागरिक यांच्यात होणाऱ्या विवाहांमधील वाढती फसवणूक ही चिंतेची बाब असल्याचे एका अहवालाद्वारे विधी आयोगाने स्पष्ट केले. 'अनिवासी भारतीय व भारतातील स्थलांतरित नागरिकांशी निगडित वैवाहिक मुद्द्यांशी संबंधित कायदा' नामक एक अहवाल विधी आयोगाचे अध्यक्ष व सेवानिवृत्त न्यायमूर्ती ऋतुराज अवस्थी यांनी गुरुवारी विधी मंत्रालयाला सुपूर्द केला. प्रस्तावित केंद्रीय कायदा एनआरआय व भारतवंशीय स्थलांतरित विदेशी नागरिक (ओसीआय) हा भारतीय नागरिकांसोबतच्या विवाहाशी निगडित सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी व्यापक असणे गरजेचे आहे, असा सल्ला आयोगाने विधी मंत्रालयाला दिला आहे.

एनआरआय व भारतीय नागरिक यांच्यात होणाऱ्या विवाहांमधील फसवणुकीचे प्रकार व प्रवृत्ती चिंताजनक असल्याचे मत कायदामंत्री अर्जुनराम मेघवाल यांना पाठवलेल्या अहवालात नोंदवण्यात आले आहे. अनेक प्रकरणांत भारतीय व एनआरआयमध्ये झालेल्या विवाहात फसवणूक झाल्याची बाब समोर आली आहे. यात भारतीय पती-पत्नी विशेष करून महिलांना बिकट परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या प्रकारचा कायदा केवळ एनआरआयसाठी नाही, तर ओसीआय दर्जा असणाऱ्या लोकांसाठी लागू करण्याची गरज विधी आयोगाने व्यक्त केली आहे. एनआरआय, ओसीआय व भारतीय नागरिक यांच्यात झालेल्या सर्व विवाहांची भारतात नोंदणी करणे अनिवार्य करण्याची शिफारस न्यायमूर्ती अवस्थी यांनी केली. प्रस्तावित कायद्यात फारकत, जोडीदाराची देखभाल, मुलांची जबाबदारी, एनआरआय किंवा ओसीआयला समन्स किंवा वॉरंट तसेच न्यायालयीन कागदपत्रे सेवा यांसारख्या तरतुदींचा समावेश करण्याचे मत या अहवालात नोंदवण्यात आले आहे.

# अयोध्येतील राममंदिरावरील नाण्याचे अनावरण



■ **नवी दिल्ली** : अयोध्येत बांधण्यात आलेल्या भव्य राममंदिरावरील नाण्याचे अनावरण अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. यासोबतच महात्मा बुद्ध आणि एक शिंग असलेला गेंडा अशा आणखी दोन नाण्यांचेही अनावरण करण्यात आले.

सार्वजनिक क्षेत्रातील इंडियन सिक्युरिटीज प्रिंटिंग अँड करन्सी मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडच्या १९ व्या स्थापना दिनाचे औचित्य साधून भगवान बुद्धाच्या ज्ञानप्राप्तीच्या स्मरणार्थ दोन धातूचे नाणे आणि एक शिंगे असलेला गेंडा (देशातील लुप्तप्राय प्राण्यांच्या मालिकेचा भाग) दर्शवणाऱ्या नाण्याचे अनावरण करण्यात आले. भगवान बुद्धांच्या ज्ञानप्राप्तीच्या स्मरणार्थ जारी करण्यात आलेले नाणे एक मर्यादित आवृत्तीचे नाणे आहे आणि त्यावर बुद्ध आणि स्तूपाची प्रतिमा आहे. अर्थमंत्री सीतारामण यांनी या वेळी कंपनीच्या पंचतंत्र संकल्पनेवर आधारित टपाल तिकीट आणि नाणी आणण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

# विरारमधील घरांसाठी ७०० पात्र अर्जदारांना आठवडाभरात देकार पत्र

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत ठरणार थेट विजेते



■ **मुंबई** : म्हाडाच्या विरार बोळिंज या मोठया गृहप्रकल्पातील २,२७८ घरांना अनेक वर्षे सर्वसामान्यांचा प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र वसई-विरार महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा करण्यात आल्यापासून घरांसाठी धिम्या गतीने का होईना प्रतिसाद वाढत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आत्तापर्यंत प्रतिसाद दिलेल्या १ हजार ६० अर्जांपैकी ७०० अर्जदारांचे कागदपत्र छाननी पूर्ण झाली असून या पात्र अर्जदारांना २४ फेब्रुवारी रोजी पार पडणाऱ्या कोकण मंडळाच्या सोडतीत देकार पत्र देण्याचे नियोजन कोकण मंडळाकडून करण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सूर्या धरणाचे पाणी म्हाडाच्या विरार बोळिंजमधील गृहप्रकल्पाला उपलब्ध करण्यात आले होते. पाणी नसल्याने या घरांना प्रतिसाद मिळत नव्हता. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य अंतर्गत २ हजार २७८ घरे उपलब्ध असूनही केवळ १ हजार ६० अर्ज सादर करण्यात आले असून यापैकी ६९१ अर्जदारांच्या अनामत रकमेसह अर्जाची छाननी पूर्ण झाली आहे. या अर्जदारांना स्वीकृती पत्र पाठवण्यात आले असून अर्जदारांनी म्हाडाकडे स्वीकृती पत्र सादर करण्यात आलेल्या अर्जदारांना देकार पत्र देण्यात येणार आहे. हे देकार पत्र शनिवार, २४ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत देण्यात येणार असल्याचे नियोजन कोकण मंडळाकडून करण्यात येत आहे.म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग येथील विविध गृहनिर्माण योजनांच्या अंतर्गत उभारलेल्या ५,३११ सदनिकांची सोडत २४ फेब्रुवारी रोजी पार पडणार आहे. या सोडतीसाठी एकूण ३०,६८७ अर्ज प्राप्त झाले असून अनामत रकमेसह २४,३०३ अर्ज प्राप्त झाले आहेत.

# पश्चिम रेल्वेवर आणखी पाच नव्या एसी लोकल येणार

## ५० एसी लोकल फेऱ्यांची पडणार भर

■ **मुंबई** : वाढत्या एसी लोकलची प्रवासी संख्या लक्षात घेऊन पश्चिम रेल्वे बोर्डाकडे १२ एसी लोकल गाड्यांची मागणी केली होती. त्यापैकी मार्च महिन्यांपर्यंत पाच नव्या एसी लोकल गाड्या येणार असून, ५० पेक्षा जास्त एसी लोकल फेऱ्या वाढणार असल्याची माहिती पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाचे विभागीय व्यवस्थापक नीरज वर्मा यांनी दिली.

एसी लोकलच्या तिकीट दर कपातीनंतर एसी लोकलच्या प्रवासी संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. त्यात त्याच सकाळी आणि संध्याकाळी पीक अवरवेळी दर एसी लोकलमध्ये इतकी गर्दी असते की दरवाजे बंद होत नाहीत. त्यामुळे वाढत्या एसी लोकलमध्ये प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वेने दोन महिन्यापूर्वी म्हणजे ६ नोव्हेंबर २०२३ पासून एसी लोकलच्या १७ फेऱ्या वाढवण्यात आल्या आहे. त्यामुळे एसी लोकलची संख्या ७९ वरून ९६ पोहोचली आहेत. सध्या पश्चिम रेल्वेकडे ८ एसी लोकल आहे. दररोज एसी लोकलच्या दिवसाला ९६ फेऱ्या होतात. विशेष म्हणजे एसी लोकलचा प्रवाशांची पसंती असल्याने पश्चिम रेल्वेने बोर्डाकडे १२ एसी लोकलची मागणी केली आहे. त्यापैकी ४ ते ५ नवीन एसी लोकल मार्च महिन्यापर्यंत ताफ्यात येतील, अशी माहिती पश्चिम रेल्वेने दिली आहे.



# रायगडात सरकारी कर्मचाऱ्यांचे एक तासाचे 'वॉक आऊट' आंदोलन

■ **अलिबाग** : राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन व अन्य मागण्या तसेच केंद्र शासनाच्या धोरणाविरोधात रायगड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनी शुक्रवार, १६ फेब्रुवारी रोजी एक तासाचे 'वॉक आऊट' आंदोलन करून निदर्शने केली. देशभरात केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा संप तसेच शेतकरी, कामगार, श्रमिक, मजदूर, आयटक, इंटक अशा देशभरातील ११ प्रमुख संघटना एकत्रित येऊन शुक्रवारी भारत बंद आणि संप पुकारला होता. परंतु महाराष्ट्र राज्यात प्रत्यक्ष संप न करता त्या संपास पाठिंबा दिला.

शुक्रवारी रायगड जिल्ह्यात शासकीय कर्मचारी यांनी सकाळी वॉकआऊट करून जोरदार निदर्शने केली. या नंतर मागण्यांचे निवेदन अपर जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. कर्मचारी शिक्षक समन्वय समितीचे कार्याध्यक्ष व जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे जिल्हा अध्यक्ष डॉ. कैलास चौलकर यांच्या नेतृत्वाखाली सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा अध्यक्ष संदीप नागे, प्रकाश पाटील, परशुराम म्हात्रे, दर्शना पाटील, प्रफुल्ल कानिटकर, दर्शना कांबळे, नीलेश तुरे, सचिन जाधव यांच्यासह इतर कर्मचारी समन्वय समिती पदाधिकारी व मोठ्या संख्येने कर्मचारी शिक्षक उपस्थित होते.

# चालकाविना धावलेल्या बसची तीन गाड्यांना तसेच घराला धडक



■ **उल्हासनगर**: हॅन्ड ब्रेक लावून चालक हा खाली उतरल्याने आपोआप सुरू झालेल्या बसने चालकाविना प्रवास करून विद्युत पोलला धडक दिली. तीन गाड्यांचे नुकसान करून ही बस एका घरावर आदळल्याची घटना उल्हासनगरात घडली आहे. तलरेजा ट्रॅव्हल्स ही बस तक्षशिला शाळेतील सहलीसाठी आणण्यात आली होती. ही बस सुभाष टेकडी परिसरातील महात्मा फुले रोडवर उतारावर उभी करून आणि हॅन्ड ब्रेक लावून चालक खाली उतरला.

मात्र आपोआप सुरू झालेल्या या बसने काही अंतरापर्यंत चालकाविना प्रवास करून तीन गाड्यांचे नुकसान केले. सुदैवाने या बसमध्ये विद्यार्थी नसल्याने व ही बस खाली असल्याने मोठा अनर्थ टळला आहे.या अनपेक्षित अपघाता प्रकरणी विठ्ठलवाडी पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतलो असून गाड्यांची नुकसान भरपाई देण्यात यावी अशी संबंधितांनी केली आहे.

# खाद्यान्न किमतीतील चढउतारामुळे महागाईचा सामना करणे आव्हानात्मक

■ **मुंबई** : खाद्यपदार्थांच्या किमतींमुळे वारंवार बसणारे धक्के, भौगोलिक-राजकीय आघाडीवर नवीन तणाव निर्माण झाल्यामुळे महागाईचा सामना करण्यासाठी आव्हाने निर्माण झाली आहेत. आम्ही डिसइन्फ्लेशनच्या शेवटच्या टप्प्याला सामोरे जाण्यासाठी सावध आहोत कारण हा प्रवासाचा सर्वात कठीण टप्पा असतो. स्थिर आणि कमी चलनवाढ शाश्वत आर्थिक वाढीसाठी आवश्यक पाया निर्माण करेल, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी ५९ व्या सेसन गव्हर्नर्स परिषदेत बोलताना सांगितले.

भारताने अनेक आव्हानांचा यशस्वीपणे सामना केला आहे आणि सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे. विवेकी आर्थिक आणि वित्तीय धोरणांमुळे कठीण परिस्थितीत भारताच्या यशाचा मार्ग मोकळा झाला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था सात टक्के दराने वाढेल, असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. हे सलग चौथे वर्ष असेल जेव्हा त्याचा विकास दर सात टक्के किंवा त्याहून अधिक असेल, असे दास म्हणाले. महागाई आता २०२२ मधील सर्वोच्च पातळीवरून खाली आली आहे. द्विमासिक चलनविषयक धोरणासाठी महत्त्वाची असलेली किरकोळ चलनवाढ जानेवारीमध्ये ५.१ टक्के होती. पण खाद्यान्नाच्या किमतीचे धक्के आणि भौगोलिक-राजकीय आघाडीवर नवीन तणाव महागाई नियंत्रण प्रक्रियेसमोर आव्हाने निर्माण करतो याचा दास यांनी पुनरुच्चार केला. नाणेनिधी धोरणाने चलनवाढ नियंत्रित करण्यासाठी आणि मागणी-बाजूचा दबाव कमी करण्यासाठी काम केले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या नवीन वास्तवाशी सुसंगत अशी धोरणे आवश्यक असल्याचे सांगून दास यांनी अनिश्चिततेच्या जगात, मध्यवर्ती बँकांना त्यांची उद्दिष्टे अधिक चांगल्या प्रकारे पूर्ण करण्यासाठी सक्रिय असणे आवश्यक आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले.

# महिलेची लाखोंची फसवणूक

■ **भिवंडी**:ऑनलाइन पैसे कमवून देण्याच्या बहाण्याने एका महिलेची नऊ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी महिलेने शांतीनगर पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सीमा निलेश धुळे (२९)असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव असून या महिलेला ११ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान आराध्या व अमन निल अशा दोघांनी ऑनलाइन माध्यमातून पैसे कमावून देण्याचे आमिष दाखवले होते.या आमिषाला बळी पडून सीमा यांनी दोघांकडे ९ लाख २६ हजार २८ रुपये आराध्या व अमन यांच्याकडे भरले होते.

# जुनी पेन्शन योजना लागू करा

■ **ठाणे** : राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना ,महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शुक्रवार , १६ फेब्रुवारीला राज्यभरात सकाळच्या सत्रात १ तास काम बंद आंदोलन पुकारले होते . त्यात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ठाण्यात महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस फेडरेशनच्या वतीने ठाण्यात निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी एक तास काम बंद आंदोलन केले . यावेळी सरकारने जुनी पेंशन योजना लागू करावी या प्रमुख मागणीसह खाजगीकरण आणि कंत्राटीकरणाच्या धोरणाशी संबंधित असलेला पीएफआरडीए कायदा रद्द करावा.

# गौण खनिजांचे उत्खनन, वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

■ **भिवंडी** : तालुक्यातील ४ गावांत अनधिकृतरित्या होणाऱ्या गौण खनिजांचे उत्खनन व वाहतूक बंद करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य यांनी भिवंडीचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. पिळंजे खुर्द,पिळंजे बुद्रुक,साखरोली,देपोली या गावातून अवैधपणे दगड,खडी,माती आदी गौण खनिजांचे उत्खनन आणि वाहतूक होत आहे.दरम्यान ही बाब पिळंजे खुर्द ग्रुप-ग्रामपंचायतीच्या सदस्या रंजना चंद्रकांत पाटील यांच्या लक्षात आल्याने त्यांनी अनधिकृत उत्खनन आणि वाहतूक बंद करण्यासाठी उपविभागीय अधिकारी अमित सानप यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

# वासिंदमध्ये घराला आग



■ **शहापूर**: तालुक्यातील वासिंद गावातील मलबारी वाड्यातील घराला शुक्रवारी सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास अचानक आग लागल्याने खळबळ उडाली. घरातील गोठ्यात बांधलेल्या २ गायींना गावकऱ्यांनी तत्काळ बाहेर काढल्यामुळे त्यांचा जीव वाचला.वासिंद बाजारपेठे लगतच्या घराला आग लागल्याने बाजारपेठेतील दुकानदार आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली. घटनास्थळी स्थानिक पोलीसांनी धाव घेऊन जेएसडब्ल्यू कारखान्याच्या अग्निशमन यंत्रणेला पाचारण केले. त्यामुळे ही आग नियंत्रणात आली.

# एटीएस-गुन्हे शाखेकडून साडेचार कोटींचे ड्रग्ज जप्त

■ **मुंबई** : राज्य दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) आणि गुन्हे शाखा यांनी मुंबईत केलेल्या धडक कारवाईत सुमारे साडेचार कोटींचे अमली पदार्थ जप्त केले. एटीएस आणि गुन्हे शाखेने या कारवाईत एका नायजेरियन तस्करासह एकूण चार जणांना अटक केली आहे. जुहू तारा रोडवरील प्रख्यात डब्ल्यू मेरिएट हॉटेलच्या समोर सापळा रचून राज्य एटीएसने एका नायजेरियन ड्रग्ज तस्कराला गुरुवारी बेड्या ठोकल्या. इगवे जॉन असे या तस्कराचे नाव असून, एटीएसने त्याच्या जवळून दोन किलो मॅफेड्रॉन (एमडी) ड्रग्ज जप्त केले. एटीएसच्या जुहू पथकाने गुरुवारी ही कारवाई केल्यानंतर जॉनकडे केलेल्या तपासात त्याच्या नालासोपारा येथील साथीदार एज्यु याने ड्रग्ज पुरवल्याचे समोर आले. त्यानुसार, एटीएसच्या पथकाने घरी छापेमारी करून २५० ग्रॅम एमडी जप्त केले. अशा प्रकारे एटीएसच्या पथकाने ३ कोटी ३७ लाख ५० हजार रुपये किमतीचे २ किलो २५० ग्रॅम एमडी जप्त केले. आंतरराज्यीय गांजाची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत गुन्हे शाखेने १.१२ कोटींचा ३७४ किलो गांजा जप्त केला आहे. जळगावमधून हा गांजा मुंबईत आणण्यात येत असताना गुन्हे शाखेने मुलुंड पूर्व परिसरात सापळा रचून गोपाळ नाटेकर आणि शरद पाटील यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

# खंडणीखोर रोमी भगतला पोलीस कोठडी

■ **मुंबई** : सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) कारवाईची भीती घालत करोडो रुपयांची खंडणी मागणाऱ्या हिरेन ऊर्फ रोमी भगत (५०) याच्या विरोधात आणखी एक खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा तपासासाठी घेत गुन्हे शाखेने भगतला अटक केली आहे. त्याला न्यायालयाने २१ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ईडीचा अधिकारी असल्याचे भासवत टूर्स अँड ट्रॅव्हल कंपनी कॉक्स अँड किंग्जच्या मालकाकडून १० कोटी रुपये रक्कम आणि लाखो रुपये किमतीचे घड्याळ अशी खंडणी उकळल्याच्या आरोपाखाली भगत याच्या विरोधात गुन्हे दाखल करून त्याच्यावर कारवाई करण्यात आली असून, त्याच्याविरोधात दाखल झालेला हा सहावा गुन्हा आहे.